MAH/MUL/ 03051/2012

ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

July To Sept.2021
Issue 39, Vol-02

Date of Publication
01 July 2021

Editor

Dr. Bapu g. Gholap

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

C.S.M's Arts & Com. College CHAKAN 410501 Tal-Khed Dist-Pune

Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan,Tal-Khed,Dist-Pune.

13) VOICE OF WOMEN IN INDIRA GOSWAMI 'S SELECT NOVELS
**Dr.Laxman Jogdand & Monika Gogoi, Ahmedpur** ||58

14) भारतातील वाढत्या लोकसंख्येची समस्या :— एक अभ्यास
**प्रा.डॉ.सुरेश बन्सपाल, जि.भंडारा (म.रा.)** ||64

15) महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येच्या कारणांचा समाजशास्त्रीय अभ्यास
**डॉ. यादव घोडके, जि. बीड** ||66

16) चिं.त्र्यं. खानोलकरांचे कादंबरी विश्व: एका प्रयोगशील काव्यात्म मनाचा आविष्कार
**प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने, जि.भंडारा** ||71

17) नाटकसाहित्यप्रकार : उगम आणि वाटचाल
**प्रा.डॉ. शिवाजी रे. एंडाईत, जि. पुणे** ||75

18) विमुक्त जती व भटक्या जमातीच्या सामाजिक-शैक्षणिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास
**प्रा.दिलीप काशिनाथ काठोडे, नवीन नांदेड** ||85

19) सत्यशोधकी मराठी जलसे
**प्रा. जगजीवन विश्वनाथ कोटांगले, भंडारा** ||88

20) साक्री तालुक्यातील अहिराणी बोलीच्या ओवीगीतांतून प्रतिबिंबीत झालेले 'भगवान श्रीकृष्णाचे' चित्रण
**प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके, जि.धुळे** ||92

21) सरयूपार मैदान (उ.प्र.) में व्यापारिक फसल प्रतिरूप एवं कृषि आधारित उद्योग
**डॉ. अभिषेक सिंह, डॉ. संजीव कुमार सिंह & सीमा सिंह, गोरखपुर (उ.प्र.)** ||94

22) NET/SET परीक्षा संशोधनात्मक अभ्यास
**प्राचार्य डॉ.शेख एस.जे, जि. जळगाव** ||106

23) लोकप्रशासन आणि नोकरशाही
**प्रा.डॉ. केशव दत्तराव तिडके, जि. बीड** ||108

24) एकांकिका : प्रयोगमूल्य
**प्रा.डॉ.नितीन कल्याण मोटे, पुणे** ||111

25) एकांकिका स्वरूपव संकल्पना
**डॉ. नाना झगडे, पुणे** ||116

26) एकांकिकेचे घटक
**डॉ. प्रकाश कारभारी शेवाळे, जि. नाशिक** ||119

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



C.S.M.'s Arts & Com. College CHAKAN 410501 Tal-Khed, Dist-Pune.
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

तृप्तीसाठी निष्पाप निरागस, सौदर्यशाली स्त्रीयांचे जीवन चोळामोळा करून उद्ध्वस्त करतात. उदा. नारोबा जडये, हरिपंत चौगुले, परशुराम तात्या, गणेश धोंड, इंग्रज सोल्जर, आप्पा ब्राम्हण, आनंदराव देसाई, खोताचा मुलगा, विलक्षण सुंदर स्त्रियांचे विवाह विद्रुप पुरूषांबरोबर होणे. आणि त्या स्त्रीयांनी पातिव्रत्यांच्या संस्काराच्या बळावर परिस्थितीचा सामना करणे हेही खानोलकारांच्या कादंबऱ्यांतून दृष्टिस पडते. खानोलकरांच्या कवी मनाची अमीट छाप त्यांच्या कादंबऱ्यांवर पडलेली दिसून येते.

संदर्भ ग्रंथ सूची :—

१) चिं. त्र्यं. खानोलकर :— 'रात्रकाळी घागर काळी', मौज प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९६३

२) चिं. त्र्यं. खानोलकर :—'अजगर', मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९६५

३) चिं. त्र्यं. खानोलकर :— 'कोंडुरा', मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९६६

४) चिं. त्र्यं. खानोलकर :—'त्रिशंकु',मौज प्रकाशन मुंबई , प्रथम आवृत्ती, १९६७

५) चिं. त्र्यं. खानोलकर :— 'गणुराया आणि चानी', मौज प्रकाशन मुंबई तिसरी आवृत्ती १९९८

६) चिं. त्र्यं. खानोलकर :— 'अगोचर', मौज प्रकाशन मुंबई, प्रथम प्रकाशन १९७५

७) चिं. त्र्यं. खानोलकर :— 'पाषाण पालवी', मौज प्रकाशन, मुंबई प्रथम प्रकाशन १९७६

८) चिं. त्र्यं. खानोलकर :— 'भागधेय', मौज प्रकाशन, मुंबई प्रथम प्रकाशन १९७६

९) डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर :— 'मराठी कादंबरी ': चिंतन आणि समीक्षा', मेहता पब्लीशिंग हाऊस, पुणे, द्वितियावृत्ती, १९९८

१०) डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर :—'मर्मवेध' हर्मिस प्रकाशन, पुणे, प्रथम आवश्ती, २०११

११) अ.अ. कुलकर्णी (संपादक):—'प्रदक्षिणा खंड २', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती, १९९८

१२) डॉ. आशा सावदेकर :—'कादंबरीचा आशयवेध', विजय प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती २०१३.

**17**

## नाटकसाहित्यप्रकार : उगम आणि वाटचाल

प्रा.डॉ. शिवाजी रे. एंडाईत
सहयोगी प्राध्यापक,
चाकण शिक्षण मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय चाकण, ता. खेड, जि. पुणे

**********

मराठी रंगभूमीचा आरंभ शोधू जाता मानवाच्या आदिम सांस्कृतिक जीवनाचा आपल्याला मागोवा घ्यावा लागतो. मूलत: मानव हा संवेदनशील प्राणी आहे. त्याने स्वत:ला व्यक्त करण्याच्या प्रक्रियेतूनच विविध कला प्रकारांचा शोध लावल्याचे दिसते. चित्र, शिल्प,वास्तू, नृत्य—नाट्य--संगीत आदी कलाप्रकारांतून माणूस व्यक्त झाला आहे. इ.स.पूर्व काळापासून नाट्यकलाप्रकारातून मानवाने स्वत:ला मोठ्या प्रमाणात व्यक्त केल्याचे संदर्भ मिळतात. भारतीय रंगभूमीचा विचार करताना, आपल्याकडील संस्कृत रंगभूमीची समृद्ध व संपन्न परंपरा पाहायला मिळते. संस्कृत भाषा व संस्कृत रंगभूमी ही भारतीय रंगभूमीची जननी आहे, असे म्हटले जाते. मराठी रंगभूमीच्या उगमाचा शोध घेताना आपल्याला संस्कृत रंगभूमीचा संदर्भ घेणे,अपरिहार्य ठरते. संस्कृत रंगभूमीप्रमाणेच इंग्रजी नाट्यवाङ्मयाचा प्रभाव व परिणाम मराठी रंगभूमीवर झाल्याचे दिसते. इसवीसनपूर्व पाचव्या शतकापासून संस्कृत रंगभूमीच्या अस्तित्वाचे काही पुरावे आपल्या दृष्टीस पडतात. इसवीसनाच्या तिसऱ्या शतकात भरतमुनींनी नाट्यवाङ्मयाचा शास्त्रीय अभ्यास मांडणारा 'नाट्यशास्त्र'हा ग्रंथ लिहिल्याचे दिसते. याचा अर्थ, संस्कृत रंगभूमीचे अस्तित्व त्याही पूर्वीचे असणार. नाट्यलेखन व नाट्यप्रयोगाची शास्त्रीय मांडणी करणारा, हा बहुमोल ग्रंथ तत्कालीन रंगभूमीची समृद्धी—संपन्नता दर्शविणारा आहे. या ग्रंथात साहित्याच्या अनुषंगाने अधिक चर्चा घडली आहे. तसेच,



C.S.M.'s Arts & Com. College CHAKAN 410501 Tal-Khed, Dist-Pune.
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan,Tal-Khed,Dist-Pune.